॥ त्या तरुतळीं विसरलें गीत ॥

गायकः सुधीर फडके
गीतः वा. रा. कांत
संगीतः यशवंत देव

त्या तरुतळीं विसरलें गीत
हृदय रिकामें घेउनि फिरतों, इथें तिथें टेकीत ॥ धृ. ॥

मुक्या मना मग भार भावना
स्वरांतुनी चमकते वेदना
तप्त रणें तुडवीत हिंडतों, ती छाया अठवीत ॥ १ ॥

विशाल तरु तरि फांदी लवली
थंडगार घनगर्द साउली
मनिंचीं अस्फुट स्मितें झळकती, तसे कवडसे तींत ॥ २ ॥

हिरवळ तृप्तिच जशी पसरली
फुलें अनामिक त्यांत विकसलीं
निळेंभोर अव्याज गगन वर हंसतें ढग पिंजीत ॥ ३ ॥

जवळ टेकडिंत झरा झांकला
कसातरी वाहतो खळखळा
निकट जिवाची पुरति न कळली जशी संभ्रमित प्रीत ॥ ४ ॥

मदालसा तरुवरी रेलुनी
वाट बघे सखि अधिर लोचनीं
पानजाळि सळसळे, वळे ती मथित हृदय कवळीत ॥ ५ ॥

पदर ढळे कचपाश भुरभुरे
नव्या उभारिंत ऊर थर्थरे
अधरीं अमृत उतूं जाय परि, पदरीं हृदय व्यथीत ॥ ६ ॥

उभी उभी ती तरुतळिं शिणली
भ्रमणीं मम तनु थकली गळली
एक गीत परि चरण विखुरले द्विधा हृदय-संगीत ॥ ७ ॥